CAREERINDIA

Language Code : **11**

# SED-24-I

**प्रश्न-पत्र-I / PAPER-I**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग-IV & V / PART-IV & V**

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code
**I**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं OMR उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **I**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/ marking responses in the OMR Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **I**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the OMR Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ____________________
: शब्दों में / in words ____________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature : Invigilator's Signature :
Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ____________________

www.careerindia.com

CAREERINDIA

Language Code : **11**

ही पुस्तिका 20 पृष्ठ आहे.

# SED-24-I

**प्रश्नपत्रिका-I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**I**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV ( भाषा I ) **किंवा** भाग V ( भाषा II ) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड I** आहे. OMR उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

: शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ____________________

www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **( प्रश्न क्र. 91** ते **120 )** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

www.careerindia.com

CAREERINDIA

## भाग–IV

## भाषा–I

## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **91** ते **99** यासाठी योग्य पर्याय निवडा :

लग्नानंतर एकदा आईच्या घरी गेले तेव्हा झाडं अगदी बेचैन असल्यासारखी वाटली, उदास वाटली. त्याची जणू वाढच खुंटली होती. अशी कंटाळलेली झाडं मी कधीच पाहिली नव्हती. मला पूर्वी कधीतरी वाचलेली एक आदिवासींची कथा आठवली. जंगलात राहणाऱ्या एका आदिवासी समाजात एक प्रथा आहे. एखादं झाड त्यांना नको असेल तर ते तोडून–छाटून नष्ट करत नाहीत. ते सगळे मिळून रोज त्या नको असलेल्या झाडाजवळ जातात आणि त्याला मनसोक्त शिवीगाळ करतात, दूषण देतात. हळूहळू ते झाड आपोआपच सुकून मरून जातं.

झाडांना बोलता येत नसलं तरी भाषा समजते. 'आर्ट ऑफ लिव्हिंग' शिकलेली माझी एक मैत्रीण तासन् तास झाडांशी बोलते, त्यांची चौकशी करते, त्यांना थोपटते, गोंजारते. अनेकदा स्वतःचं मन झाडांपाशी मोकळंही करते. ती म्हणते, 'झाडांना कधीच रागावण्याची किंवा मारण्याची वेळ येत नाही, ती शहाणीच असतात.' मग माणूसच असा का?

माणसाचं छोटंसं बाळ जेव्हा जन्माला येतं तेव्हा त्याचं रूप किती निरागस असतं. बीजामधून नुकत्याच अंकुरलेल्या दोन कोवळ्या पोपटी पानांसारखं. निरसं रूप म्हणू या त्याला! कुठल्याही भाव–भावनांचा स्पर्श न झालेलं. व्यवहारी विश्वात संचार करणाऱ्या आपल्या आईच्या उदरात सुरक्षितपणे राहणारा तो जीव म्हणजे निसर्गाचं मानवप्राण्याच्या जीवनचक्रातलं सर्वात सुंदर, सर्वात निर्मळ रूप! सत्य–असत्य, व्यवहार–व्यापार ह्या कशाचाही स्पर्श न झालेलं. त्यालाही सत्यच प्रिय असतं. त्याच्या दृष्टीने सत्य म्हणजे त्याची माता. निसर्गाच्या विलक्षण निकट असलेली किंबहुना निसर्गाशी प्रामाणिक असलेली अशी त्याची आई. अंकुरणाऱ्या बिजाला, जशी माती तशी तान्हुल्याला माता! जसजसं मूल मोठं होतं तसं ह्या व्यवहारी जगात तरबेजपणाने जगणारी माणसं, त्याच्या अवतीभवतीचे आपण सगळेच त्याला निसर्गापासून दूर नेतो. प्रत्येक सजीवाला 'आतला आवाज' असतो. त्याच्यातल्या संजीवनतेचं, चैतन्याचं ते रूप असतं. प्रत्येक सजीवाला मूलतः त्या आतल्या आवाजाचं आकर्षण असतंच; पण दिवसांगणिक वाढणाऱ्या त्या बाळाला आपण प्रयत्नपूर्वक व्यवहारी जगात खेचतो. इथली मूल्यं फारच वेगळी असतात. इथलं जीवन हे व्यवहारमय झालेलं असतं.

**91.** 'पण <u>दिवसांगणिक</u> वाढणाऱ्या त्या बाळाला' यातील अधोरेखित काय आहे ?

(1) कर्म (2) कर्ता (3) न्यूनत्वबोध अव्यय (4) क्रियापद

**92.** 'सर्वात निर्मळ रूप' यातील निर्मळ काय आहे ?

(1) कर्ता (2) कर्म (3) अव्यय (4) विशेषण

**93.** झाड नको असेल तर आदिवासी काय करतात ?

(1) झाडांना पाणी घालीत नाही. (2) झाडांना खत घालीत नाही.

(3) झाडांवर अधिक प्रेम करतात. (4) झाडांना दूषण देतात.

**94.** बाळाच्या दृष्टीने एकमेव सत्य म्हणजे _________.

(1) विश्व (2) त्याची आई (3) व्यावहारिक सत्य (4) निसर्ग

**95.** लेखिकेची मैत्रीण झाडांशी पुढीलपैकी काय करीत नाही ?

(1) झाडांजवळ मन मोकळं करते.

(2) झाडांना थोपटते.

(3) झाडांना रागवते.

(4) झाडांशी बोलते.

**96.** पुढीलपैकी विरुद्ध अर्थ देणारी शब्दजोडी ओळखा.

(1) सुंदर – निर्मळ (2) सत्य – असत्य

(3) भाव – भावना (4) व्यवहार – व्यापार

**97.** 'निरागस' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द ओळखा.

(1) आकस (2) पारदर्शी (3) निष्पाप (4) प्रांजळ

**98.** लेखिकेच्या मते बाळ जन्माला आल्याबरोबर कसं दिसतं ?

(1) भाव–भावनांचा स्पर्श झालेलं

(2) सत्य–असत्याची जाण असलेलं

(3) स्पर्शाची जाण असलेलं

(4) कोवळ्या पोपटी पानासारखं

**99.** 'बाळाला आपण प्रयत्नपूर्वक व्यवहारी जगात खेचतो.' यातील अधोरेखित शब्दाचे व्याकरण ओळखा.

(1) प्रायोजक क्रियापद (2) सकर्मक क्रियापद

(3) अकर्मक क्रियापद (4) साधीत क्रियापद

CAREERINDIA

**सूचना :** पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक **100** ते **105** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा :

रात्र अशी सुनसान, उदासी घेउनिया पाऊस आला,
सांग कुणाचे व्याकुळ डोळे घेउनिया पाऊस आला ?

तुझ्या घरावर, कौलारावर असेल बरसत या वेळी,
हाक तुझी भिजलेली ओली घेउनिया पाऊस आला.

पुस्तकात मिटुनी सुकलेले फूल कुणितरी ठेवियले
तशा स्मृती मिटलेल्या हळव्या घेउनिया पाऊस आला.

घेतलास तू निरोप माझा तेव्हा मिटल्या डोळ्यांनी,
मौन तुझे ओथंबुन भरले घेउनिया पाऊस आला.

**100.** प्रस्तुत कवितेतून कवीने पुढीलपैकी काय व्यक्त केले आहे ?

(1) पावसाचा निरामय आनंद
(2) स्वर्ग सुखाचा आनंद
(3) फुलांचे महत्त्व
(4) विरहभावना

**101.** आलेला पाऊस पुढीलपैकी काय घेऊन आलेला नाही ?

(1) भिजलेली हाक
(2) ओथंबलेले मन
(3) आनंदाचे गाणे
(4) व्याकूळ डोळे

**102.** 'घेऊनिया पाऊस आला' यातील 'पाऊस' काय आहे ?

(1) विशेषनाम (2) कर्ता (3) नाम (4) समुहवाचक नाम

**103.** 'तुझ्या <u>घरावर</u>, <u>कौलारावर</u> असेल बरसत' यातील अधोरेखित शब्दाचे व्याकरण ओळखा.

(1) शब्दयोगी अव्यय
(2) केवलप्रयोगी अव्यय
(3) क्रियाविशेषण
(4) उभयान्वयी अव्यय

**104.** कवीच्या मते आलेला पाऊस कशाचे प्रतीक आहे ?

(1) सुकलेल्या फुलाचे
(2) घेतलेल्या निरोपाचे
(3) मनातील आनंदाचे
(4) उदासिनतेचे

**105.** 'मौन तुझे ओथंबुन भरले' यातील 'ओथंबुन' म्हणजे _________.

(1) अर्धे भरले
(2) पूर्ण भरले
(3) मिटल्या डोळ्यांनी भरले
(4) काठोकाठ भरले

www.careerindia.com

**106.** उत्पादक शब्दसंग्रह म्हणजे ________.

(1) ओळींच्या पलिकडे जाऊन शब्द वाचल्यास लक्षात येतो

(2) लेखनात आणि बोलण्यात वापरतो तो शब्द

(3) वाचकास नवीन असलेला शब्द

(4) शब्द जसे ऐकतो तसे ओळखणे

**107.** आकलनासह वाचन या संदर्भात पुढीलपैकी कोणते कौशल्य गृहित धरले जात नाही ?

(1) आशयाचा पूर्वानुमान करणे.

(2) आशय आणि घटनांची योग्य मांडणी आणि मूल्यमापन.

(3) आत्तापर्यंत वाचलेल्या मजकुराचा मानसिक गोषवारा करणे.

(4) स्वतंत्र अक्षरावर भर देणे.

**108.** शिक्षिका आपल्या विद्यार्थ्यांना विचारते, 'मी दिलेल्या अनुभवावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुम्ही कशी दिलीत आणि त्यांची उत्तरे देताना तुमच्या मनात नक्की काय सुरू होते ?' हे ________ याचे उदाहरण आहे.

(1) काल्पनिक पदबंध (Metaphor)

(2) अधिभाषिकता (Metalingualism)

(3) अधिसंकेत विज्ञान (Metasemiotics)

(4) अधिज्ञानात्मकता (Metacognition)

**109.** पुढीलपैकी व्याकरण–अनुवाद माध्यमातून द्वितीय भाषा शिकवण्याचे कोणते वैशिष्ट्य नाही ?

(1) द्वितीय भाषेच्या व्याकरणाचे नियम शिकणे व पाठ करणे.

(2) थेट दुसऱ्या भाषेत बोलणे आणि नंतर दोन्ही भाषांच्या व्याकरणिक नियमांची तुलना करणे.

(3) भाषेच्या वर्तनापेक्षा भाषेच्या घटकांवर भर देणे.

(4) प्रथम आणि द्वितीय भाषेच्या व्याकरणिक नियमांची तुलना करणे.

**110.** मानवी भाषेतील कोणत्या वैशिष्ट्यांमुळे माणसे त्यांच्या नजीकच्या काळात अस्तित्त्वात नसलेल्या वस्तू, घटनांबद्दल बोलू शकतात ?

(1) स्वच्छंदता (Arbitrariness)

(2) संरचना अवलंबित्त्व (Structure dependence)

(3) तारतम्य (Discreteness)

(4) स्थानांतरण (Displacement)

www.careerindia.com

**111.** पुढीलपैकी कोणते विधान 'भाषा आत्मसात तंत्र' (LAD) चे योग्य विश्लेषण नाही ?

(1) 4-5 वर्षांच्या लहानशा कालावधीत मुले भाषा कशी शिकतात.

(2) मुले अलंकारिक भाषा कशी शिकतात.

(3) मुलांच्या भाषिक आदानापेक्षा भाषिक प्रदान जास्त कशामुळे होते.

(4) मुले त्यांची प्रथम भाषा कशी शिकतात.

**112.** भाषा आणि बोलीच्या संदर्भात भाषिकदृष्ट्या कोणते विधान **अचूक** आहे ?

(1) भाषा आणि बोली भाषिकदृष्ट्या वेगळ्या असतात पण भौगोलिकदृष्ट्या एकच असतात.

(2) भाषेची आपली लिपी असते पण बोलींची त्यांची लिपी नसते.

(3) भाषा आणि बोलीची भाषिक पृथगात्मता दाखवणारे कोणतेही योग्य निकष नाही.

(4) भाषांचे लिखित साहित्य असते मात्र बोली मौखिक परंपरेत असतात.

**113.** पुढीलपैकी कोणते विधान अक्षरांपासून वाचन सुरू करण्याऐवजी शब्द आणि लहान गोष्टीपासून सुरू करण्याच्या संदर्भात समर्थन करीत नाही ?

(1) शब्द आणि मजकूर अर्थपूर्ण संबंध स्थापित करतात, अक्षरं करू शकत नाहीत.

(2) शब्द आणि मजकूर मजेशीर असतात, अक्षरं नसतात.

(3) स्वतंत्र शब्द पाठ करणे अवघड असते, शब्दांच्या तुलनेत.

(4) प्रारंभीचे वाचक मोठ्या भाषिक घटकांवर चांगले लक्ष देऊ शकतात, लहान घटकांऐवजी.

**114.** मातृभाषाधारित बहुभाषिकत्त्व कशाचा पुरस्कार करते ?

(1) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात प्रदेशाची भाषा यापासून करतात.

(2) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात इंग्रजी आणि घरच्या भाषेतून करतात.

(3) सर्व मुले प्रथम भाषा म्हणून हिन्दी शिकतात.

(4) सर्व मुलांनी त्यांच्या शिक्षणाची सुरुवात मातृभाषा/घरची भाषा याने करावी.

**115.** पुढीलपैकी कोणती बाब क्राशेन (Krashen) चे सिद्धांत आणि व्यगोत्स्की (Vygotsky) च्या ZPD' त समान आहे ?

(1) लक्ष देणे सिद्धांत (Monitor hypothesis)

(2) नैसर्गिक क्रम सिद्धांत (Natural order hypothesis)

(3) परिणाम झिरपणे सिद्धांत (Affective filter hypothesis)

(4) आदान सिद्धांत (Input hypothesis)

**116.** कमिन्सच्या (Cummins) आंतर अवलंबित्वाच्या सिद्धांतानुसार पुढीलपैकी कोणत्या गोष्टी एकमेकांवर अवलंबित असतात ?

(1) प्रथम आणि द्वितीय भाषेत ज्ञानात्मक शैक्षणिक नैपुण्य.

(2) द्वितीय भाषेत वाचन आणि लेखन.

(3) मूलभूत परस्पर कौशल्ये – प्रथम आणि द्वितीय भाषेत.

(4) द्वितीय भाषेत आकलन आणि उत्पादन.

**117.** संहिता आकलनाच्या पद्धतींच्या संदर्भातले **चुकीचे** विधान शोधा ?

(1) चाळणे म्हणजे सखोलपणे वाचणे, तर न्याहाळणे म्हणजे घाईघाईने केलेले वाचन.

(2) चाळणे हे फेरपाहणीसाठी योग्य आहे, तर न्याहाळणे विशिष्ट उत्तर शोधण्यास मदत करते.

(3) चाळणे आणि न्याहाळणे या दोन्हीत जलदपणे मजकुरावर दृष्टिक्षेप अपेक्षित असते.

(4) चाळणे (Skimming) या प्रक्रियेत मजकूर भरभर पाहिला जातो, तर न्याहाळणे (Scanning) यात विशिष्ट माहिती शोधली जाते.

**118.** जेव्हा मुले भाषेच्या माध्यमातून वस्तू, घटना, सभोवतालच्या घटनांबद्दल विचारतात तेव्हा ते इतरांपेक्षा कोणत्या भाषिक घटकांचा अधिक वापर करतात ?

(1) नियंत्रित (2) सूचनात्मक (3) स्वयंशोध (4) काल्पनिक

**119.** भाषिक समुदायात 's' चे उच्चारण दोन वेगवेगळ्या सामाजिक–आर्थिक गटातील माणसांकडून वेगवेगळ्या प्रकारे होते असे लक्षात येते. हे कशाचे उदाहरण आहे ?

(1) व्यावहारिक परिवर्तन

(2) समाज सांस्कृतिक परिवर्तन

(3) समाज–मानसशास्त्रीय परिवर्तन

(4) समाज भाषा वैज्ञानिक परिवर्तन

**120.** वीरा एक सात महिन्याची मुलगी आहे. ती आता स्वर आणि व्यंजनयुक्त आवाज काढते. ती पुढीलपैकी कोणत्या प्रकारे संभाषण करते ?

(1) बडबड (2) हुंकारणे (3) भाषिक कथन (4) स्वन

CAREERINDIA

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र. 121** ते **150** ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

→

www.careerindia.com

CAREERINDIA

**भाग–V**

**भाषा–II**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **121** ते **128** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा :

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका म्हणजे लेणींचे आगारच! कारण याच तालुक्यात दीडशेपेक्षा अधिक लेणी पाहायला मिळतात. त्या आजूबाजूच्या डोंगरांच्या पोटात खोदलेल्या दिसतात. यातली बहुतांश लेणी हिनयान या बौद्ध पंथाच्या आणि तिसऱ्या शतकातील असल्याचे इतिहासकारांचे मत आहे. असाच एक लेणीसमूह मानमोडी डोंगराच्या पोटात खोदलेला आहे. तसे पाहिले तर या मानमोडी डोंगरात तीन लेणी समूह आहेत. तीनही समूह अतिशय देखणे आहेत. त्यांची नावे आहेत– अंबा–अंबिका, भूतलेणी आणि भीमाशंकर लेणी. या लेणी म्हणजे मानवी कलात्मकतेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार.

पोल्ट्रीपासून चढण्यास सुरुवात केली की साधारण अर्ध्या तासात आपण अंबा–अंबिका, लेणींपाशी पोहोचतो. तिथे पोहोचण्याची वाट सोपी आहे तसेच काही ठिकाणी पायऱ्याही बांधलेल्या दिसतात. इतर दोन लेणींच्या तुलनेत या लेणी बऱ्यापैकी मोठ्या आहेत. त्यांच्या समोर भले मोठे पटांगण आहे. पटांगणामागे कातळातल्या भिंतीवर कोरलेला शिल्पखजिना आपल्याला अक्षरशः स्तंभिक करतो. या लेणींमध्ये सर्वप्रथम आढळते ती स्वच्छता आणि शांतता. मानमोडी डोंगराकडे फारच थोडे पर्यटक फिरकतात. मोजके अभ्यासक लेणी प्रेमी सोडले तर या लेणींत सामसूम असते. या लेणीसमूहात विहार, चैत्यगृह, पाण्याची कुंडे अशा एकूण 33 लेणींचा समावेश आहे. पुरातत्त्व विभागाने त्यांना 18 ते 34 असे क्रमांक दिलेले आढळतात. ('भीमाशंकर' गटाच्या 17 लेणींनंतर पुढचे क्रमांक अंबा–अंबिका गटाला दिले आहेत). या लेणी बहुमजली असून उत्तरेकडे तोंड करून खोदलेल्या आहेत. बऱ्याच लेणींचे खोदकाम जमिनीलगत आहे. कातळावरच्या भागात लेणींकडे तोंड केले की आपल्या डाव्या हाताकडून किंवा पूर्वेकडून या लेणी पाहायला सुरुवात करायची. यातील 30 क्रमांकाची लेणी विशेष आहेत. जिन्याने वर गेलो की उजव्या बाजूला सलग पाच खोल्या दिसतात. चौथ्या खोलीत जैन शिल्पकाम दिसते. इतिहास अभ्यासकांच्या मते ही शिल्पे जैनांचे तीर्थंकर नेमिनाथ आणि जैन देवतेची आहेत. यातील अंबिका देवी आंब्याच्या झाडाखाली बसलेली आहे. या देवीच्या नावावरूनच या गटाला अंबा–अंबिका असे नाव मिळाल्याचे सांगितले जाते. पण काही इतिहासकार थेट महाभारतातील अंबा–अंबिका या पात्रांचे दाखले देतात, पण हे लेणे आहे मात्र बौद्धकालीनच. मुख्य चैत्यगृहाच्या भिंतींवर, गवाक्ष कमान, खांब या साऱ्यांवर दहा मोठे ब्राह्मी लिपीतील लेख कोरलेले होते असे अभ्यासक सांगतात. पण कालौघात आणि संवर्धनाच्या कामात आता फक्त आठच लेख शिल्लक आहेत. या साऱ्या लेखातून लेणींच्या निर्मितीबाबत तसेच दानधर्माबाबत माहिती मिळते. यानंतर काही विहार आणि पाण्याची टाकी लागतात.

**121.** लेणी समूहांबद्दल लेखकाने न काढलेला उद्‌गार कोणता ?

(1) लेणींचे खोदकाम जमिनीलगत आहे.

(2) मानवी कलात्मकतेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार.

(3) त्यांच्या समोर भलेमोठे पटांगण आहे.

(4) या बौद्ध पंथाच्या नाहीत.

www.careerindia.com

**122.** जुन्नर तालुक्यातील लेणी कोणत्या शतकातील आहे ?

(1) तिसऱ्या (2) चवथ्या

(3) पाचव्या (4) दुसऱ्या

**123.** संचय, संग्रह करण्याचे ठिकाण या शब्दांचा समानार्थी शब्द म्हणजे ________.

(1) विहार (2) लेणी (3) माघार (4) आगार

**124.** इतिहासकार लेणींच्या नावासाठी कोणत्या ग्रंथांचे संदर्भ देतात ?

(1) महाभारत (2) रामायण

(3) उद्धवगीता (4) भगवद्गीता

**125.** एकवचन–अनेकवचनी शब्द जोड्यांपैकी **चुकीची** जोडी शोधा :

(1) कमान–कमानी (2) खाते–खाती

(3) खांब–खांबे (4) शिल्प–शिल्पे

**126.** अंबा–अंबिका लेणींमध्ये लेखकाला प्रथमदर्शनी काय जाणवले ?

(1) पर्यटक व प्रवाशी (2) स्वच्छता आणि शांतता

(3) खांब आणि कमान (4) खोदकाम आणि पायऱ्या

**127.** 'कातळ' शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द कोणता ?

(1) पाषाण (2) दगड

(3) कातरवेळ (4) खडक

**128.** लेणींतील कोरीव कामांतून कोणत्या बाबतीत माहिती मिळते ?

(1) लेणी प्रेमी (2) दान–धर्म

(3) पुरातत्त्व विभाग (4) अभ्यासक

CAREERINDIA

**सूचना :** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **129** ते **135** यासाठी योग्य पर्यायाची निवड करा :

दह्याची पौष्टिकता दुधाइतकीच असली तरी यातील प्रथिने दुधापेक्षा लवकर पचली जातात. साधारणतः 30 ते 50 ग्रॅम एवढे दही दुपारच्या वेळी खाणे आरोग्यास हितकारक असते. दही करताना साधारणतः अर्धा लिटर दुधामध्ये 1 मोठा चमचा विरजण घालावे. ते विरजण ताज्या दह्याचे असावे. विरजणावरच दह्याचा स्वाद अवलंबून असतो. जर विरजण मधुर आंबट असेल तर होणाऱ्या दह्याची चवही आंबट–गोड असते व याचा सुगंधही चांगला असतो. सहसा नेहमी ताजे दही आहारात वापरावे, म्हणजे ते आरोग्याला बाधत नाही.

उन्हाळ्यामध्ये दही पटकन तयार होते, तर थंडीमध्ये दही तयार होण्यास उशीर लागतो. उन्हाळ्यात सात ते आठ तासांमध्ये दही लागते तर हिवाळ्यात 14-15 तास लागतात. अशा प्रकारे ताजे दही आहारात वापरावे. फ्रीजमध्ये ठेवून किंवा अति आंबवून आंबट झालेले व थंड असे दही आहारात वापरू नये. त्याचप्रकारे बाहेरचे विकत घेतलेले दही आहारात वापरू नये. अनेक वेळा विकतच्या दह्यामध्ये भेसळ असण्याची शक्यता असते व हे दही टिकवण्यासाठी परिरक्षकाचा वापर करतात व हे परिरक्षक आरोग्यास घातक असतात. त्याने रक्त व पित्त दूषित होऊन आम्लपित्त, सर्दी, खोकला असे अनेक आजार निर्माण होतात.

दह्यात प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे, लोह व कॅल्शिअम ही नैसर्गिक मूलद्रव्ये भरपूर प्रमाणात असतात. दुधाचे दही बनविताना त्यात निर्माण होणारे व शरीरास आवश्यक असलेले उपयुक्त जंतू (लॅक्टोबॅसिल्स) हे आरोग्यासाठी महत्त्वाचे असतात. हे उपयुक्त जंतू आतड्यामध्ये गेल्यावर तेथील हानिकारक जंतूंना नष्ट करतात व पचनास आवश्यक उपयुक्त बॅक्टेरियांची निर्मिती करतात. दही त्वचा स्निग्ध व मऊ बनविते. दही खायचेच असेल तर मधुर ताजे दही दुपारच्या वेळात खावे किंवा दह्याचे ताक करून प्यावे. असे ताक पचनशक्ती वाढविणारे असते. ताक हे नक्कीच दह्यापेक्षा जास्त गुणकारी असते.

दह्याऐवजी त्यापासून निर्माण होणारे ताक हे आरोग्यास अत्यंत उपयुक्त आहे. दही घुसळून त्यात पाणी घालून ताक बनवावे. ताक हे अग्निदीपक, अन्नाची रुची वाढविणारे व अन्नाचे पचन करणारे असते. ताक हे पातळ असल्यामूळे स्रोतोरोध निर्माण होत नाही व पर्यायाने आजारांची लागण होत नाही म्हणून दिवसभरातून ताज्या दह्यापासून बनविलेले ताजे ताक, रोज चार ग्लास प्यावे. यामध्ये लॅक्टोबॅसिल्स असल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते व त्यामुळे मनुष्य आजारांपासून दूर राहतो.

**129.** लेखकाच्या मते ताक सेवन केल्याने माणूस कोणत्या गोष्टींपासून अलिप्त राहतो ?

(1) आजार (2) दही (3) पचन (4) परिरक्षक

**130.** 'थंडी<u>मध्ये</u>' या शब्दातील अधोरेखित भाग म्हणजे ________.

(1) शब्दयोगी अव्यय (2) क्रिया विशेषण

(3) विशेषनाम (4) उभयान्वयी अव्यय

www.careerindia.com

**131.** 'सर्दी, खोकला असे <u>अनेक</u> आजार होतात' वाक्यातील अधोरेखित शब्द _________.

(1) सामान्यनाम (2) विशेषण

(3) क्रियापद (4) विशेषनाम

**132.** पुढीलपैकी सामान्यनाम नसलेला पर्याय शोधा.

(1) मनुष्य (2) जीव

(3) ताक (4) जंतू

**133.** दह्यात आढळणाऱ्या तत्त्वांपैकी लेखकाने न सांगितलेला घटक कोणता ?

(1) जीवनसत्त्वे (2) परिरक्षक (3) खनिजे (4) प्रथिने

**134.** लेखकाच्या मते लवकर पचणारा घटक कोणता ?

(1) खनिजे (2) लोह

(3) उपयुक्त जंतू (4) प्रथिने

**135.** ताकामुळे कोणती गोष्ट होत नाही ?

(1) रोगप्रतिकार (2) अन्नरुची

(3) त्वचा स्निग्धता (4) स्रोतोरोध

**136.** मूल्यमापनाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य नाही ?

(1) ते विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे ठोस पुरावे सादर करते.

(2) ते विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा वेग पडताळण्यास मदत करते.

(3) ते फक्त शिक्षक करू शकतात.

(4) ते विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे समग्र चित्र उपस्थित करते.

**137.** बहुभाषिकता आणि बहुसांस्कृतिकतेचा प्रचार करण्यासाठी पुढीलपैकी कोणता कथाप्रकार सर्वात प्रस्तुत ठरेल ?

(1) आत्मकथन

(2) विज्ञान कथा

(3) काल्पनिक कथा (लेन्दी टेल)

(4) लोककथा

CAREERINDIA

**138.** स्टीफन क्राशेनच्या 'नियंत्रित कल्पना सिद्धांत' (Monitor hypothesis) च्या संदर्भात कोणते विधान योग्य **नाही** ?

(1) याचा आधार भाषा आत्मसात करणे आणि शिकणे यांच्या संबंधावर आहे.

(2) काय 'शिकले' आहे हे पाहण्यासाठी काय 'आत्मसात' केले याचा उपयोग होतो.

(3) विद्यार्थी तेंव्हाच पाहू शकतो जेंव्हा त्याच्याकडे पुरेसा वेळ आणि नियमांचे ज्ञान असते.

(4) याचा वापर द्वितीय भाषा आत्मसात करण्याच्या संदर्भात होतो.

**139.** पुढीलपैकी कोणती कृती मजकुराचे आकलन आणि शब्दसंग्रह विकासाच्या बाबतीत उपयोगी ठरणार नाही ?

(1) बाराखडी तक्ता (2) आशय नकाशा

(3) चित्र संग्रह (4) शब्द–नकाशा

**140.** पुढीलपैकी बालसाहित्यातील इच्छित नसलेला घटक कोणता ?

(1) स्पष्ट नैतिक मूल्ये

(2) मोठ्या आकाराची अक्षरे आणि परिचित शब्द

(3) आकर्षक चित्रे

(4) प्राणी–पात्र

**141.** महत्त्वाच्या दोन मूल्यमापनांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

(1) सारांशात्मक (Summative) मूल्यमापन म्हणजे वर्षभरात केलेल्या प्रत्येक प्रारूपाच्या मूल्यमापनाची बेरीज आहे.

(2) रचनात्मक मूल्यमापन हे संपूर्ण शिक्षणावस्थेत सातत्याने सुरू राहते.

(3) सारांशात्मक मूल्यमापन हे शिक्षण प्रक्रियेच्या अगोदर आणि शिक्षणप्रक्रियेदरम्यान सुरू राहते.

(4) रचनात्मक मूल्यमापन हे भाषेच्या कार्यापेक्षा भाषेच्या रूपावर भर देते.

**142.** संज्ञापनात्मक धोरणाचे (Communicative Approach) पुढीलपैकी कोणते वैशिष्ट्य नाही ?

(1) भाषेचा ससंदर्भ वापर

(2) स्पष्टपणे शिकवण्यापेक्षा व्याकरण नियम जाणून घेणे

(3) संज्ञापनात्मक नैपुण्य विकसित करणे

(4) प्रारूपापेक्षा कार्यावर भर देणे

www.careerindia.com

CAREERINDIA

**143.** शिक्षिका हिन्दी भाषी विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवताना स्पष्टपणे नियम न सांगता त्यांना संदर्भ आणि संधी देत लहान लहान इंग्रजी वाक्यातून संभाषणात गुंतवून ठेवते. ती त्यांना उदाहरणे देते जी मुले संभाषणात वापरतात. हळूहळू, त्यांना शिक्षिकेच्या मदतीने आपसुकच नियमांचे आकलन होते. तुमच्या मते शिक्षिका कोणत्या पद्धतीचा अवलंब करते ?

(1) श्रव्य–भाषिक पद्धती

(2) संभाषणात्मक पद्धती

(3) थेट पद्धती

(4) व्याकरण–भाषांतर पद्धती

**144.** प्रारंभिक अवस्थेचा वाचक जेव्हा विशिष्ट मजकुरातील अर्थ लावताना आणि त्यातील आशय, सांस्कृतिक संदर्भ समजून घेण्यासाठी स्वतःच्या सामान्य ज्ञानाचा वापर करतो/करते. त्याला _________ म्हणतात.

(1) टॉप–अप पद्धती (Top-up Approach)

(2) उर्ध्वगामी पद्धती (Bottom up Approach)

(3) बॉटम–डाऊन पद्धती (Bottom-down Approach)

(4) अधोगामी पद्धती (Top down Approach)

**145.** पुढीलपैकी कोणते शिक्षणाचे कार्यक्षेत्र मानले नाही ?

(1) समाज–सांस्कृतिक

(2) भावनात्मक (Affective)

(3) मानसिक–स्नायू वर्तन (Psychomotor)

(4) ज्ञानात्मक (Cognitive)

**146.** समावेशी वर्गाची रचना करताना पुढीलपैकी कोणता घटक उपयोगी ठरणार नाही ?

(1) गट कार्य देणे

(2) बहुभाषिक धोरणाचा स्वीकार

(3) वर्गात काही मुले वर्गप्रतिनिधी (Monitors) म्हणून असणे

(4) मित्रमंडळीतली चर्चा आणि प्रत्याभरण (Feedback)

www.careerindia.com

CAREERINDIA

**147.** पुढीलपैकी रचनात्मक मूल्यमापनाचे कोणते उदाहरण नाही ?

(1) सत्राच्या शेवटी सत्रांत पेपर.

(2) संपूर्ण कालावधीत व्यापलेले सर्व समावेशक लेखी मूल्यमापन आणि इतर उपक्रमांचे एकत्रीकरण.

(3) मूल्यमापनाचे असे धोरण ज्यात अगदी संक्षिप्त चाचण्या ते सवंगड्याने केलेले मूल्यमापन संपूर्ण सत्रात सुरू राहते.

(4) संपूर्ण सत्रात तोंडी आणि लेखी कार्य, भूमिकाभिनय इत्यादींची सुरू असलेली मालिका.

**148.** शिक्षणातील उणिवा लक्षात घेण्यासाठी चुकांचे विश्लेषण महत्त्वाचे असते, कारण ________

(1) चुका म्हणजे विद्यार्थ्यांची बौद्धिक कुवत आणि त्यांची शैक्षणिक अवस्था जाणून घेण्याचे साधन.

(2) चुका या विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीच्या उणिवांचा संकेत आहे.

(3) चुकांच्या माध्यमातून संकल्पनात्मक विकास आणि अभिप्रेरण निदर्शनास येते.

(4) बहुतांश चुका या विद्यार्थ्यांच्या आडमुठेपणामुळे होतात.

**149.** 'p' ला 'b' किंवा '6' ला '9' वाचणे किंवा लिहिणे ही मुलांमध्ये आढळणारी सामान्य बाब आहे. हे कशामुळे होते ?

(1) अफासिया (Aphasia)

(2) नाम अक्षमता (Anomia)

(3) वाचन अक्षमता (Dyslexia)

(4) ततपप करणे (Stuttering)

**150.** प्राथमिक परस्पर संभाषण कौशल्य म्हणजे ________.

(1) अमूर्ततेची भाषा

(2) दैनंदिन संभाषणात वापरलेली भाषा

(3) आंतर भाषा

(4) उच्च पातळीचे भाषिक कौशल्य

- o O o -

www.careerindia.com

SPACE FOR ROUGH WORK

www.careerindia.com

CAREERINDIA

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थीनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि OMR उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि OMR उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/OMR उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा OMR उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी OMR उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

www.careerindia.com

CAREERINDIA

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस OMR उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक OMR उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/OMR उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना OMR उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने OMR उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और OMR उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व OMR उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the OMR Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the OMR Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the OMR Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and OMR Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and OMR Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/OMR Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their OMR Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the OMR Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and OMR Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the OMR Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

www.careerindia.com